" A++ "
Re-accredited by NAAC
(2021) With CGPA - 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,
# डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र.

## परिपत्रक

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी १३० व्या जयंतीनिमित्त बुधवार दिनांक १४ एप्रिल २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पोर्चमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुजनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांचे शुभहस्ते व मा. प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केला आहे. तरी विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनीं यांनी कोव्हीड १९ नियमांचे पालन करून या कार्यक्रमास उपस्थित रहावे.

Mahajan
8/4/21
संचालक

संदर्भ क्रं. शिवाजी वि/बा.आं.सं.वि.कें./ 619
दिनांक : 08 APR 2021

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.
३. सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डवर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
४. प्रमुख, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.
५. आभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सूचना संबंधीतांना द्यावी.
   अ) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा द्वारमंडप (पोर्च) येथे उपलब्ध करून दयावी व कार्यक्रम संपलेनंतर परत आहे त्याठिकाणी लावण्याची व्यवस्था करणेबाबत.
   ब) कार्यक्रमाचे ठिकाणी व परिसरात स्वच्छता ठेवण्याची व्यवस्था करण्याबाबत.
६. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या कुंडया, फ्लॉवर पॉट द्यावेत तसेच कार्यक्रमाची सुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.
७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचा शिपाई यांनी पुष्पहार व फुले यांची व्यवस्था करावी.
८. समारंभाच्या ठिकाणी रांगोळीची व्यवस्था करावी.
९. श्री.देवगोंडा चौगुले, जमादार व श्री. बाळू वालकोळी, जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टुल उपलब्ध करून दयावे व कार्यक्रमाच्या वेळी एक शिपाई या विभागाच्या शिपायाचे मदतीस देणेचा आहे. अथवा स्वत: उपस्थित रहावयाचे आहे.
१०. विद्यार्थी विकास विभागाने कार्यक्रमाच्या ठिकाणी हार फुले ठेवण्याकरीता स्टील प्लेटची व्यवस्था करावी.

—०००—